# ।। सिमरण को अंग ।।
# मारवाडी + मराठी
# सत्संग

महत्वाची सुचना:- रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.


✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

## ।। अथ सिमरण को अंग लिखंते ।।

सवईयो इंद व छंद

सिंघ सो गज ।। श्वान सुसे जूं ।।
बिल्ली कूं देख ।। मुसंबर धायो ।।
बासग वाज सुणी गरड ।। डर प्यांळ कूं पेसत बार न लायो ।।
गवाळ कूं देख नही सिंघ ठादो ।। जागत गांव ज्यां चोर न आवे ।।
नाव प्रताप कहे सुखदेवजी ।। बाज सुणे यूं अध भगाबे ।।१।।

सिंहाची गर्जना ऐकून हत्ती पळून जातो.कुत्र्याला पाहून ससा पळतो.मांजरीला पाहून




उंदीर पळतो.गरुडाला पाहून साप घाबरुन(भिऊन)पाताळात म्हणजे धरतीत जायला वेळ करत नाही.गुराख्याला पाहून लांडगा उभा राहत नाही.जागृत असलेल्या गावात आलेला चोर पळून जातो किंवा गावात चोर येतच नाही.

अशाप्रकारे कैवल्य नामाची ध्वनी म्हणजे रामनाम मुखातून निघताच घटातील सर्व पाप पळून जाते म्हणजे नाश होतात असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।१।।

कवत्त:–


क्हा ओस को नीर ।। फूस क्हा तप कहायो ।।
गेणो क्हा कथीर ।। रूख ईरंड क्हा बायो ।।
धुवे को क्या कोट ।। गड़े को मोती लीजे ।।
आक कांठ को म्हेल ।। झूट केतोईक रीजे ।।
बादळ की क्या छांह ।। जाळ डोको घर आणे ।।
केवळ बिन सुखराम ।। नाव असा सब जाणे ।।२।।

१)जगात सरोवराच्या गोड पाण्याला पाणी म्हणतात तर दवाच्या पाण्यालाही ही पाणीच म्हणतात.
२)कोळशाच्या आगीला अग्नी म्हणतात तर कचऱ्याच्या आगीला ही अग्नीच म्हणतात.
३)सोन्याच्या दागिन्यांना दागिना म्हणतात तर कथीलाचे दागिने ही दागिनेच आहे.
४)सागवानाच्या वृक्षाला वृक्ष म्हणतात तर एरंडीच्या वृक्षालाही वृक्षच म्हणतात.
५)दगड चुन्या ने बनलेल्या किल्ल्याला जसे किल्ला म्हणतात तर धुक्याचा किल्ल्या लाही किल्लाच दिसतो.
६)जसे हंस भक्षण करतात त्या खऱ्या मोतीला मोती म्हणतात तर आकाशातून पडलेल्या गारा म्हणजे शितही मोती सारखेच दिसतात.

७)सागवान लागडापासून बनलेल्या घराला महल म्हणतात तर रुचकीलपासून बनलेल्या घराला महलच म्हणतील.

८)झाडाच्या सावलीला सावलीच म्हणतात तर ढगाच्या सावलीला सावलीच समजतात.

९)मशालीच्या जाळाला जाळ म्हणतात तर ज्वारीच्या पेटलेल्या धांड्यालाही जाळच म्हणतात.




अशा प्रकारे कैवल्य नामाला नाव म्हणतात तर त्रिगुणी मायेपासून जन्मलेल्या नावांना ही नावच म्हणतात परंतु सरोवराचे पाणी, कोळशाची आग,सोन्याचे दागिने,सागवानाचे वृक्ष,दगड चुन्याचा किल्ला,हंस भोजन करतात ते असली मोती,सागवानाच्या लाकडाने बनलेला महल,झाडांची सावली,मशालीचा जाळ हे सर्व खरे आहेत तर दवाचे पाणी,कचऱ्याची आग,कथीलाचे दागिने,एरंडीचे झाड,धुक्याचा किल्ला,गार म्हणजे शितचा मोती,रुचकीलाच्या लाकडापासून बनविलेले घर,ढगाची सावली,जळालेल्या ज्वारीचा धांड्याचा जाळ हे सर्व,खोटे आहेत.

कारण १) तहानलेल्याची सरोवराच्या गोड जलानेच तहान मिटते,दवाच्या पाण्याने कधी तहान मिटत नाही.

२) स्वयंपाक कोळशाच्या आगीने होतो,कचऱ्याच्या आगीने कधी स्वयंपाक बनत नाही.

३) सोन्याचे दागिने धनाची गरज पड्ल्यावर कामात येतात,कथीलाच्या दागिन्यांनी धनाची प्राप्ती कधी होत नाही.

४) सागवानाच्या वृक्षापासून घर बनविण्याकरीता लाकूड मिळते तर एरंडीच्या वृक्षापासून घर बनविण्याकरीता कधीही लाकूड मिळत नाही.

५) दगडा चुन्याचा किल्ला शत्रुंपासून संरक्षण करतो तर धुक्याचा किल्ला शत्रूंपासून कधी संरक्षण करु शकत नाही.


६) असली मोतीचं हंसाचे पोट भरु शकतो,आकाशातून पड्लेल्या मोती सारखे दिसणारे जलाचे मोती हंसाची भूक कधी मिटवू शकत नाही.

७) सागवानपासून बनलेला महल राहण्याकरीता कामी येतो.तर रुचकीनच्या लाकडापासून बनलेला महाल राहण्याकरीता कधी कामी येऊ शकत नाही.)

८) तापलेल्या सूर्यापासून संरक्षण करण्याकरीता वृक्षाची सावली कामी येते.ढगांची सावली कधीही सूर्याच्या तपन पासून संरक्षण करु शकत नाही.

९) मशालीच्या जाळेने अंधाऱ्यात मनुष्य एका जागेहून दुसऱ्या जागी जाऊ शकतो तसेच घरात स्वयंपाक बनविण्याकरीता कोळसे जळविण्याकरीता दुसऱ्या घरातून

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।





आपल्या घरी आणून कोळसे जळवू शकतो परंतु ज्वारीच्या धांड्याच्या जाळेपासून अंधाऱ्यात मनुष्य एका जागेहून दुसऱ्या जागी जाऊ शकत नाही तसेच दुसऱ्याच्या घरातून आपल्या घरी आणून कोळसे जाळू शकत नाही कारण जाळ मध्येंच विझून जातो.

अशाप्रकारे कैवल्यनाम आणि अन्य सर्व नाम आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,कैवल्य नामाने जीव सर्व कर्मांपासून मुक्त होतो आणि जीव कर्मातून मुक्त होतो या कारणाने होनकाळातून मुक्त होतो परंतु मायेचे सर्व नाम मायेपासून उपजलेले राहतात.माया कर्म आहे म्हणून हे सर्व नाम कर्मांच्या रुपात जीवाला जडतात.कर्म हेच काळ आहे या कारणाने जीव मायेच्या कोणत्याही नामाने काळापासून मुक्त होत नाही.


आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व ज्ञानी,ध्यानी तसेच जगाचे स्त्री–पुरुषांना सांगतात की,असे मायेपासून उपजलेले सर्व नाम भवसागरातून पार होण्याकरीता खोटे आहेत तर सतस्वरुपातून उपजलेले सतनाम भवसागरातून तिरण्याकरीता खरे आहे. ।।२।।

राम नाम सत्त जाण ।। राम बिन झूट सगाई ।।
गोत कडुंबो बोहोत ।। अंत अेको होय जाई ।।
हटवाड़े को लोक ।। आण ग्रेही सब मेळा ।।
आप आप के काज ।। आण सब ही व्हे भेळा ।।
बिणज करे बोपार ।। संच अपने घर जावे ।।
जन सुखिया नर मुढ ।। गिरे को दाम गमावे ।।३।।




रामनाम हेच सत्य जाना.रामनामाच्या शिवाय गोत कुटूंब म्हणजे आई,वडिल,पत्नी,मुलगा,मुलगी तसेच सगे संबंधी हे सर्व शरीराचा अंत आल्यावर काळाच्या दुःखांपासून मुक्त करण्याकरीता खोटे समजा.कैवल्य रामनाम हेच शरीराचा अंत झाल्यावर हंसाला काळाच्या हातात पडू देत नाही.


गोत कुटूंब सोडवण्याकरीता सोबत येत नाही.जीव एकटाच काळाच्या हातात अटकलेला राहतो.




नाम सोबत राहते आणि काळाच्या पलीकडच्या महासुखाच्या देशात घेऊन जाते.जन्म घेतला आहे तर मरावे लागतेच म्हणजे हंसाला शरीर सोडावेच

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

लागते.हंसाला जे शरीर ज्या घरात मिळाले आहे तेथे त्या शरीराचे गोत कुटूंब म्हणजे




आई,वडिल,भाऊ,बहिण,पत्नी,मुलगा,मुलगी,जावई,काका, आजोबा,आजी असे अनेक सगे संबंधी खूप आहेत.परंतु हे शरीराचे गोत कुटूंब शरीराचा अंत झाल्यावर एकही सोबत चालत नाही शरीराला सोडून हंसाला एकटेच जावे लागते आणि एकट्याने कर्म केले तसे काळाचे धक्के खावे लागतात.या काळाच्या कष्टातून सोडविण्याकरीता एवढे मोठे गोत कुटूंब असल्यावरही एकही सोबत आला नाही म्हणून हे सर्व गोत कुटूंबाच्या सोबतची प्रिती जी खरी दिसत होती तो खोटी निघाली.परंतु जर जीवाने रामनाम सोबत चालते आणि काळाच्या दु:खापासून मुक्त करते हे सत्य जाणले असते तर तो एकटा राहिला नसता, त्याच्या सोबत रामनाम राहिले असते ज्याच्याने काळाचे दु:ख पडत नाही.म्हणून सर्व स्त्री–पुरुषांनी हे समजले पाहिजे की कितीही मोठे गोत कुटूंब राहिले तरीही यांच्या सोबतची प्रिती खोटी आहे आणि रामाच्या सोबतची प्रिती खरी आहे.

जसे लोक बाजारात आप आपल्या खरेदी विक्रीच्या कामाकरीता इकडून तिकडून आलेले राहतात आणि खरेदी विक्री करुन आपल्या घरी निघून जातात त्याचप्रकारे हंस वेग वेगळ्या लोकातून आपसात आपआपले घेण्यादेण्याचे बदले चुकविण्याकरीता एका परीवारात येतात आणि बदला चुकवून ज्या घरात आले तेथून एकटेच शेवटी घर सोडून निघून जातात.हे बदले चुकवितांना परीवाराच्या मोहमायेच्या कारणाने हंसाकडून उच–निच नवीन कर्म बनतात आणि कर्मांच्यानुसार हंसाच्या मागे काळ लागून जातो आणि हंसाला काळ दु:ख भोगवितो.हे आधीच ज्ञानाने समजून घेतले असते की शेवटी एकटे जायचे आहे.येथे बाजारात जसे वेगवेगळ्या गावाचे लोक माल घेण्या–देण्याला जमा होतात अशा परीवारात कर्मांचे घेण्या देण्याचे बदले चुकविण्याकरीता जमा झाले.या समजने चतुर मनुष्याने परीवाराशी मोह माया करुन नवीन कर्म केले नसते आणि बदला चुकविण्याच्या सोबत जो रामजी सोबत येतो त्याच्या सोबत प्रिती करुन त्याचे स्मरण केले असते ज्याच्याने काळाचे दु:ख पडत नाही.परंतु बाजारात व्यापार करुन कमाई करण्याकरीता चतुर मनुष्य येतो तसे बाजारात मूर्ख मनुष्य ही येतो.चतुर मनुष्य बाजारात जाऊन कमाई करतो तर मुर्ख मनुष्य बाजारात व्यापार करण्याकरीता आणलेले धन भांड तमाशा पाहण्यात गमावून देतो.याचप्रकारे मूर्ख मनुष्य परीवारात येऊन आपल्या मनुष्य शरीराचे श्वास रामजीच्या भजनात न लावता गोत कुटूंबाच्या मोहमायेत अटकून कर्म करतो आणि काळाचे महादु:ख ८४ लाख योनीत ४३,२०,००० वर्षांपासून भोगतो असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज जतवून राहिले

आहे.।।३।।

यूं ग्रेहे मे सब जीव ।। हाट मंज भेळा होई ।।
नफो समजीया होय ।। बस्त मोलावो कोई ।।
गाफल गोता खाय ।। गिरे को दाम गमावे ।।
भांड भया देखाय ।। फेर पाछा पिस्तावे ।।
मेळो बिखर जाय ।। फेर कारी नही लागे ।।
ओ ओसर सुखराम ।। फेर मोसर नही जागे ।।४।।


जसे बाजारात अनेक लोक जमा होतात तसे घरात सर्व जीव जमा झाले.बाजारात समजून नफ्याची कोणी वस्तू घेईल तर त्याला नफा होईल आणि जो नफ्याची वस्तू खरेदीत गाफिल राहिल आणि भाडांच्या खेळ तमाश्यात लागून आणलेले धन डोंबारीच्या तमाशात गोते खाऊन गमवून देईल त्याला धोका होईल.संध्याकाळ होईल बाजार विस्कळीत होईल मग ज्याला धोका झाला त्याने नफ्याची वस्तू घेण्याचा विचारही केला तर घेऊ शकणार नाही कारण जवळचे धनच डोंबारीच्या तमाशांमध्ये गमवून दिले आणि वस्तूंचा बाजारही बिखरुन गेला.असा मनुष्य शेवटी पस्तावा करु लागतो परंतु पस्तावा केल्याने नफ्याची वस्तू प्राप्त करण्याचे काम होत नाही. अशाप्रकारे घरातील सर्व जीव आहे.कोणी मोह मायेमध्ये उदम आपदेमध्ये घराच्या गाऱ्हाण्यात आणलेली श्वासाची पुंजी गमवून दिली आणि यमाच्या हाती विकला गेला तर कोणी आणलेली श्वासाची पुंजी रामनामाच्या स्मरणात लावली तो रामजीच्या देशाला गेला आणि महासुखी झाला.

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व स्त्री–पुरुषांना सांगतात की,शरीर सुटण्या आधी रामस्मरणाचा निर्णय घ्या.शरीराचा अंत झाल्यावर रामभजनाचा निर्णयही घेतला तरीही शरीरापासून हंस वेगळा झाल्यावर हंसाला काळापासून मुक्ती प्राप्त करण्या करीता रामजीला सोबत प्राप्त करण्याचा उपयोग ही चाहिला तरीही होणार नाही उलट अशा हंसाला शरीर सुटल्यानंतर ४३,२०,००० वर्षापर्यंत ८४,००,००० योनीमध्ये दुःख भोगावे लागते.म्हणून रामजी प्राप्त करण्याकरीता मनुष्य शरीराची वेळच कामा येते दुसऱ्या शरीराने रामजी प्राप्त केला जात नाही आणि मनुष्य शरीर वारंवार मिळत नाही असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व स्त्री–पुरुषांना जतवून राहिले आहेत. ।।४।।

जिण मुख मे हर नाम ।। करम का जोर न लागे ।।
भूत प्रेत छळ छिद्र ।। जम दूरा सूं भागे ।।
बिषे ब्याध सब जाय ।। रोग व्यापे नही कोई ।।

**चोरासी कूं काट ।। जीत जन निर्मळ होई ।।**
**देव करे प्रणाम ।। बिस्न ब्रम्हा सिव चावे ।।**
**जन सुखिया निजनांव ।। ब्रम्ह के माय मिलावे ।।५।।**


ज्या जीवाच्या मुखात हरनाम आहे म्हणजे रामनाम आहे त्या जीवावर काळ भोगवेल




अशा कर्मांचा जोर लागत नाही.अशा रामनामी मनुष्याला भूत,प्रेत, छ्ल, छिद्र तसेच यम लागत नाही उलट ते रामनामी संतापासून दूर पळतात.अशा रामनामी संताची विषयवासना मरुन जाते आणि शरीराच्या सर्व व्याध्या मिटून जातात तसेच विषय वासनेच्या भोगाने लागणारे रोग विषय वासना सुटून गेल्याने व्यापत नाही.असे रामनामी संत काळाला जिंकून आपली ८४,००,००० योनी मिटवून टाकतात आणि रामनामाच्या स्मरणाने कर्मांच्या किटापासून निर्मल होऊन जातात.अशा निर्मळ संतांना ब्रम्हा विष्णू,महेश शक्ती धरुन सर्व स्वर्गादिकाचे देवता निर्मळ प्रणाम करतात.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात अशा निजनामाने निर्मळ बनलेल्या संताला निजनाम आनंदब्रम्हच्या महासुखात पोहचवतो.।।५।।

**ज्यां सिमऱ्या हर नाव ।। जीत निसाण घुराया ।।**
**मिल्या ब्रम्ह सूं जाय ।। सुन्न मे सेर बसाया ।।**
**ज्यूं जळ गळीयो लूण ।। समंद सिलता ज समाणी ।।**
**प्राण मिल्यो यूं जाय ।। नाव जुग माय निसाणी ।।**
**क्हा कहुं इण नाव की ।। आगे अगम लखाय ।।**
**जन सुखिया रट नाव रे ।। गरक हुवा इण माय ।।६।।**

ज्याने कुटुंब परीवारातून मोहमाया काढून रामजीचे स्मरण केले त्याचे होणकाळातून



जिंकण्याचा झेंडा ३ लोक १४ भवनात फड्कला म्हणजे होणकाळाला जिंकण्याची महिमा होते आणि हंस शरीराचा अंत झाल्यावर होनकाळातून निघून आनंदब्रम्हच्या सुखाच्या शुन्य शहरात जाऊन बसला.जसे मीठ पाण्यात मिळते,नदी सागरात मिळते तसे प्राण आनंदब्रम्हमध्ये मिळतो. मीठ पाण्यात विरघळल्यानंतर मीठाचे नाव लोकांच्या मुखात राहते.पाण्यात मिळालेले मीठाचे अस्तीत्व जगत दाखवू शकत नाही तसेच नदी सागरात मिळून गेल्यानंतर नदीचे नाव लोकांच्या मुखात राहते परंतु सागरात नदी वेगळी दिसत नाही.शरीरातून प्राण निघाल्यावर आनंदब्रम्हमध्ये मिळून गेल्यानंतर शरीराचे नाव जगामध्ये सेनानी म्हणजे निशाणीच्या रुपात राहते परंतु प्राण जगात राहत नाही तो आनंदब्रम्हमध्ये मिळालेला असतो.जसे मीठ पाण्यात मिळाल्यानंतर

मनुष्याच्या मुखात पाण्यात मिळालेल्या मीठाचे नाव राहते परंतु त्यांना पाण्यात मिळालेल्या मीठची ओळख मीठ म्हणून करता येत नाही तसेच जसे नदी सागरात मिळून गेल्यानंतर सागरात मिळालेल्या नदीचे नाव मुखावर राहते परंतु सागरात ती नदी वेगळी ओळखली जात नाही असेच शरीराचे नाव जगात निशाणी रुपात राहते आणि प्राण आनंदब्रम्हमध्ये मिळून गेल्या कारणाने तो हंस होणकाळात कोठे दिसत नाही.

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात,की या निजनामाचा पराक्रम तसेच वाहवा ही काय सांगू हे मन,बुध्दी,चित्त,समज या सर्वांच्या पलीकडील असे अगम समजण्यात येतो.

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,असे रामनाम जीभेने रटणारे रटत रटत निजनामात गर्क होऊन जातात. ।।६।।

राम नाम निज सार ।। समज सिमरे जन सोई ।।
सुरग लोक पाताळ ।। जुग मे प्रगट होई ।।
जम माने मर जाद ।। चाल पासे नही आवे ।।
दूरा सूं दंडोत ।। साध को द्रसण चावे ।।
मोगा पित्तर भूत ।। अगति सुण सब हरकाया ।।
सुखराम नाम प्रताप ।। जीव कूं सिव मिलाया ।।७।।



सर्व नामात रामनाम हे सार आहे आणि जो संत याला सार समजून स्मरण करेल तो होनकाळाला जिंकून आनंदब्रम्हमध्ये पोहचला म्हणून स्वर्गादिक, पाताळ तसेच मुत्युलोकात प्रगट राहिल.अशा निजनामी संताची यम आदराने मर्यादा मानतो आणि निजनामी संत मूत्युशय्येवर पडलेल्या नरकीय जीवाजवळ बसले किंवा उभे आहे तर तो यम दुरुन निजनामी संताचे दर्शन घेतो,दंडवत करतो आणि निघून जातो.असे निजनामी संत कुळात प्रगटल्याने कुळातील आतापर्यंत बनलेले मोगा,पितर,भूत ह्या सर्व अगती योन्या आमची अगतीमधून मुक्ती होईल म्हणून हर्षायमान होतात.

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,असा निजनामाचा प्रताप आहे हे निजनाम रटणाऱ्या जीवाला शिव म्हणजे साहेब मिळवून देतो.।।७।।

राम सब्द समरथ ।। समंद मे सेन्या तारी ।।
पिरथी क्रोड़ पचास ।। सेंस ले सिरपर धारी ।।
सब्द रटयो प्रेहेलाद ।। असुर सारा पच मुवा ।।
ग्रभ गुफा सुखदेव ।। सब्द सूं पलटया सुवा ।।

संकर अमर सबद सूं ।। पारबत्ती प्रळे पडी ।।
सुखिया सिम्रथ नाव ओ ।। ऊमाने अमर करी ।।८।।

हा केवळ रामशब्द कसा समर्थ आहे यावर संसाराचे काही दाखले आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी जगाच्या स्त्री पुरुषांना दिले आहे.या रामशब्दाच्या पराक्रमाने रामचंद्र सागरावर पूल बांधु शकला.रामचंद्राला राक्षसी रावणाचा नाश करण्याकरीता वानरसेना समुद्राच्या पलीकडे लंकेला घेऊन जायची होती.लांब,चौडा तसेच अथांग पाणीने भरलेल्या समुद्राला पार करणे अशक्य होते.अशी अशक्य गोष्ट रामनामाच्या पराक्रमाने शक्य करुन घेतली आणि सागरावर रामनामाच्या आधाराने पूल बांधून सेना लंकेला घेऊन गेला.शेषनागाला सृष्टीची रचना करते वेळी पन्नास कोटी योजन धरती सदाकरीता स्थिर ठेवत डोक्यावर उचलायची होती.एवढी भारी धरती डोक्यावर उचलणे आणि सदा स्थिर ठेवणे शेषनागाला अशक्य दिसून राहिले होते.शेषनागाने अशी अशक्य गोष्ट रामनामाच्या सामर्थ्याने शक्य करुन घेतली.रामनामाच्या आधाराने धरती इतकी हलकी होऊन गेली की शेषनागाला डोक्यावर धरती धारण केल्यावर थोडेसे ओझे आजपर्यंत जाणवले नाही न जाणवून राहिले.

प्रल्हाद केवळ राम रटून राहिला होता.बलवान आणि क्रोधी वडील हिरण्यकश्यपला प्रल्हादाचे केवळ राम रटणे थोडेसेही पसंत नव्हते म्हणून प्रल्हादच्या वडिलाने सर्व राक्षसांद्वारे प्रल्हादाला मारण्याचा निर्णय घेतला.प्रल्हादाला मारण्याकरीता जमा झालेचे सर्व राक्षस प्रल्हादाला मारण्यात पचून गेले शेवटी सर्व मारले गेले परंतु प्रल्हादाला केवळ राम रटल्याने थोडीशीही दुखापत झाली नाही.

वेदव्यासाचा पुत्र सुखदेव हा सुखदेव बनण्याच्या आधी पोपट पक्षी होता.तो पोपट केवळ रामाच्या बळाने सुखदेव नावाचा मनुष्य बनला आणि त्या सुखदेवाने बारा वर्षापर्यंत आईच्या गर्भाला गुफा समजून केवळ रामचे रटन केले.राम रटल्याने मिळालेल्या सुखाचा आनंद सुखदेवाने आईच्या गर्भात घेतला.संहार कर्ता शंकर महाप्रलय होण्याच्या आधी प्रलयात जातो.असे मधेच शरीर न सुटो आणि महाप्रलय पर्यंत अमर राहील म्हणून शंकराने संसाराचे सर्व सुख त्यागले आणि राम राम रटण्याचा जोर पकडला.परिणामत: शंकर महाप्रलयापर्यंत अमर झाला.शंकर रामनामाने अमर झाला परंतु त्याची पत्नी पार्वती वारंवार प्रलयात पडत होती.अशी पार्वती १०८वेळेस प्रलयात पडली.अशा प्रलयात पडणाऱ्या आपल्या पत्नीला शंकराने रामनामाच्या सामर्थ्यांने आपल्या वयापर्यंत म्हणजे महाप्रलयापर्यंत अमर केले.असा समर्थ कैवल्य राम आहे हे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व ज्ञानी,ध्यानी तसेच जगाच्या स्त्री–पुरुषांना सांगून राहिले आहेत. ।।८।।

चली सैन्या कर कोप ।। रेत रावण कू मारूं ।।
जब बोले रूघनाथ ।। भक्त मेरा मे तारूं ।।
मरू मरू मे राम ।। राम मुख ईनके आवे ।।
मरूं केत मुनेस ।। सदा मेरा जस गावे ।।
हा हराम मे राम ।। जाण अेक यवन तार्‍यो ।।
अर्ध नाव सुण अवाज ।। ग्रहा गजराज उबार्‍यों ।।
सिंवर्‍यो जाण अजाण ही ।। अजामेळ उधारीयो ।।
गुण अखर सुखराम के ।। र रो म मो के तारीयो ।।९।।

लंकेमध्ये रामाची सेना रावणाच्या प्रजेवर क्रोध करुन जिवंत प्रजेला मारण्याकरीता तुटून पड्ली त्यात रावणाची प्रजा मरु लागली तर मरणारी प्रजा मरण्यासारखा मार बसल्याने मी मेला,मी मेला असे मुखाने बोलू लागली.असे मरा मरा प्रजेच्या मुखाने निघू लागले तेव्हा रघुनाथ म्हणाला ही मरणारी रावणाची प्रजा मुखाने मरा मरा बोलून राहिली आहे म्हणजे उलटे राम मुखाने रटूनू राहिली आहे.असेच उलटे राम रटून महाकुलक्षणी डाकू रत्नाकर डाकूचा मुनी झाला आणि रामनामाच्या सामर्थ्यांने माझ्या जन्माच्या १०,००० वर्षापूर्वी मी वशिष्ठ मुनीला गुरु करुन रामभक्त बनेल आणि होणकाळाला कापून मोक्षात जाण्याचे यश प्राप्त करेल हे भविष्य वर्णन केले.तोच मरा शब्द ही प्रजा मुखाने उच्चारुन राहिली आहे.मरा शब्दाने म्हणजे रामशब्द उलटा जपून वाल्मिक मोक्षात गेला.

जसे वाल्मिकला नारदापासून मरा शब्द मिळाला आणि त्याच्याने वाल्मिकचा काळ सुटला अशाप्रकारे ही मरणारी प्रजा मरते वेळी मरा शब्द उच्चारुन राहिली.जसे नारदाने रत्नाकर डाकूला भक्त बनवून काळापासून सोडविले असे मी ही शेवटी मरा मरा बोलणार्‍या सर्व प्रजेला माझा भक्त बनवून काळापासून सोड्वेल.

यवन म्हणजे मुसलमान काळापासून उध्दार करण्याकरीता रामशब्द मुखाने बोलत नाही. अशाच प्रसंगाने एक यवन शौचासाठी धनदाट जंगलात बसला.त्याच स्थितीत एक क्रोधी जंगली डुक्कराने त्या मुसलमानाला जीवे मारुन टाकले.मुसलमान लोक डुकराला हराम म्हणतात.मरते वेळी मुस्लिमच्या मुखाने डुकराच्या जागी डुकरासाठी हराम शब्द निघाला.त्या हराममध्ये रामशब्द होता याकारणाने त्या मुस्लिमचा उध्दार होऊन गेला.

असेच एक हत्ती पाण्याने भरलेल्या सागरात रमून राहिला होता.त्याच सागरात मगर सुध्दा होता.मगराला पाण्यात हत्तीपेक्षा जास्त पकड असते.त्या बलशाली हत्तीला मगर ओढून हत्ती बुडेल अशा पाण्यात घेऊन जाऊ लागला.जसा हत्ती बुडू लागला

त्याच्या तोंडात पाणी गेल्याने आणि पोटातील हवा बाहेर निघल्याने र र र र या शब्दाची ध्वनी झाली.मगरापासून सुटका प्राप्त करण्याकरीता हत्तीने मगराला पायाखाली दाबले.इकडे हत्ती पाण्यात बुडून कारणाने मेला आणि मगर हत्तीच्या पायाखाली चिरडल्याने मेला.हत्तीने मुखाने र र र र ध्वनी केली आणि मगराने हत्तीच्या तोंडातून निघालेली ररंकाराची ध्वनी ऐकली.फक्त कैवल्य रामातील अशा प्रकारे अर्धा शब्द र र र र मुखातून काढल्याने हत्तीचा उध्दार झाला तर र र र र शब्द मगराने फक्त कानाने ऐकल्याने मगराचा उध्दार झाला.

अशाच प्रकारे अजामेळाचा ही उध्दार झाला.अजामेळ महाकुकर्मी होता.त्याच्या अंतसमयी त्याला घेऊन जाण्याकरिता जातीने यमराज आला.अशा अक्राळ विक्राळ यमराजाला पाहून अजामेळाने मदतीकरीता आपला पुत्र रामनारायणला राम्या राम्या म्हणून हाक मारली आणि हाक मारताच अजामेळाचा अंतीम श्वास पूर्ण झाला आणि अजामेळचा प्राण सुटून गेला.मुखाने अंतीम समयी राम्या शब्द उच्चारण झाल्या कारणाने यमराजाने त्याला सोडून दिले.अशाप्रकारे काळापासून अजामेळ मुक्त झाला.

अशाप्रकारे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व जगाच्या स्त्री–पुरुषांना सांगतात की, ज्याने ज्याने कैवल्य रामाला जाणते अजाणते राम म्हणून गायले किंवा जाणते अजाणते रत्नाकर डाकू सारखे उलटे गायले,मुस्लिम सारखे हराम शब्दात राम गायले,गजराज सारखे राममधील अर्धा शब्द र र र र गायला,मगरासारखा राम मधील अर्धा शब्द र र र फक्त ऐकला अजामेळ सारखा पुत्राला राम्या नामाने गायले.ते सर्व तरुन गेले.तर आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व जगाच्या ज्ञानी,ध्यानी,स्त्री, पुरुषांना समजवितात की,या रामनामाच्या असा गुणच आहे की अर्धा र किंवा र सोबत म असे पूर्ण राम उच्चारले तरीही उच्चारणाऱ्याचा उध्दार झाला. ।।९।।

सोर सिल्ला सिंघ सब्द ।। करम कुंजर उड़ भागे ।।
गरूड पांख सुन पनंग ।। प्राण सुणतां तन त्यागे ।।
नाग निवण मुख नाव ।। सुधा विष को गुण जारे ।।
पाप रूप पाषाण ।। नाव नौका ज्यूं तारे ।।
बड़ी रसायण नाव निध ।। जड़ी जुगत सूं जोडले ।।
सुखराम दास सोगी सबद ।। करम कनक सेजां गळे ।।१०।।

बारुद ने मोठे मोठे पहाडी दगड चुरा चुरा होऊन जातात तसेच सिंहाला पाहून हत्तीचे कळपचे कळप पळून जातात.अशाप्रकारे रामनाम उच्चारल्याने अनंत जन्मांचे जटीलहून जटील(कठिणाहून कठिण)कर्म नाश होऊन जातात.जसे गरुड पक्षीला पाहताच भारी विषारी नागाची प्राण त्यागल्यापर्यंतची स्थिती बनून जाते असेच रामनाम

घेणाऱ्याचे कर्म ढिले पडून जातात आणि अन्तोगत सर्व कर्म मिटून जातात.जसे जंगलात एक नागनिवण नावाची जडी राहते.त्याच्याने नागाच्या दंशाने शरीरात पसरलेले विष नष्ट होऊन जाते. त्या नागनिवण जडीत हा ही पराक्रम आहे की ती जडी नागाला दाखवली तर नाग गरीब होऊन निघून जातो.अशाप्रकारे रामनाम आहे.राम नाम घेण्याऱ्याचे कर्म नष्ट होऊन जातात आणि नवीन कर्म लागत नाही.जसे कोणाच्या शरीरात विषारी वस्तू खाल्याने विष पसरुन जाते आणि त्याला अशा मृतक अवस्थेत अमृत पाजून दिले तर त्याच्या तनाच्या रोमारोमात पसरलेल्या विषाचा गुण मिटून जातो आणि मनुष्य वाचून जातो.अशाप्रकारे रामनाम घेणाऱ्याच्या शरीरातील कर्मरुपी काळ नष्ट होऊन जातो आणि तो मनुष्य काळाच्या दु:खातून वाचून जातो.जसे जड्डून जड दगड नौकेत ठेवल्यावर नौका त्याला सागराच्या एका किनाऱ्याहून दुसऱ्या किनारी घेऊन जाते आणि दगडाला पाण्याहून भारी जड असल्यावरही बुडू देत नाही.अशाप्रकारे ज्याच्या मुखात रामनाम आहे,तो कर्मांचा कसाही जड प्राण असला तरीही रामनाम त्याला काळाच्या मुखात जाऊ देत नाही आणि भवसागरातून पार करवून देतो.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की कसेही सोने असो त्याच्यात सुहागी टाकताच ते सोने वितळून जाते अशाप्रकारे कैवल्य राम शब्द आहे.तो जीवाचे कसेही जड भारी कर्म असो ते सर्व कर्म गळवून देतो.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,रामनाम हे मोठे रसायन आहे जो या शब्दाला युक्तीने जोडून घेईल म्हणजे धारण करुन घेईल त्याचा ८४,००,००० योनीचा आवागमनाचा फेरा मिटून जातो.।।१०।।

**चंदण बनि जड़ जाण ।। परस चंदण बन हुवा ।।**
**इम्रत पियो अजाण ।। करे सजीवन मुवा ।।**
**लोहा पारस परसता ।। जड कंचन होय जावे ।।**
**काम धेन कल ब्रछ ।। मांग मंछया फळ पावे ।।**
**राम नाम चिंत्रामणी ।। मन चिंत्या कारज करे ।।**
**सुखराम प्राक्रम बस्त को ।। ज्यां नाव भज भौजळ तिरे ।।११।।**

जसे वनात चंदनाचे वृक्ष स्वभावाने एका जागीच राहतो असा जड आहे.तो कोठे हलत, फिरत नाही परंतु त्याच्या पराक्रमाने त्याच्याजवळ असणारे सर्व वृक्ष चंदनासारखे सुगंधित होऊन जातात.ते संपर्कात आलेल्या झाडांची चंदनासारखी शोभा होते. अशाप्रकारे रामनाम आहे.जो मनुष्य रामनामी साधूच्या संपर्कात येईल तो मनुष्य रामनामी साधूसारखा बनून जाईल.अशा साधूची धरतीलोक,स्वर्गलोक तसेच पाताळ लोकात शोभा येईल.मरण्याच्या अंतीम स्थितीत आलेला मनुष्य अजाणताच अमृत

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

पिले तरीही अमृत त्या जीवाला मरण्या पासून थांबवून देतो आणि जिवंत करुन देतो. अशाप्रकारे रामनाम अजाणतेच घेतले तरीही तो जीव काळापासून मुक्त होतो आणि महासुखात जातो.लोखंडाला पारसचा स्पर्श होताच जड लोखंड सोने होऊन जाते. अशाचप्रकारे कैवल्य राम जपल्याने जीव काळाच्या चपेट मधून निघून सतस्वरुपाचा शिव बनून जातो.कामधेनू तसेच कल्पवृक्ष मनाच्या चाहनेनुसार मागितल्यावर मायेचे फळ देतो असेच रामशब्द जीवाला निजनामाच्या चाहणानुसार काळा पासून मुक्त करवून अमरलोकात पोहचवण्याचे फळ देतो आणि संसाराचे सुख वाढवतो आणि संसाराचे दु:ख घटवतो.

चिंतामणी जसे जीव मनात चिंतन करतो तसे फळ देतो.अशाप्रकारे रामनाम अमरदेशात पोहचवण्याचे फळ देतो आणि संसाराचे आधी,व्याधी,उपाधी पासून मुक्त करतो,जसे चंदन,अमृत,पारस,कामधेनु,कल्पवृक्ष,चिंतामणी इत्यादित आपले आपले फळ देण्याचा पराक्रम आहे तसेच रामनामात भवसागरातून तारण्याचा पराक्रम आहे. आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात जे जे स्त्री पुरुष रामनाम भजतील ते सर्व भवसागरातून तिरतील. ।।११।।

कुंडल्यो ।।

प्रिक्षत सिंव्यो सात दिन ।। षट दलिप अेक जाम ।।
ना मे तो भारी कहयो ।। हलको कह्योस राम ।।
हलको कह्योस राम ।। पात ज्यूं पाहण ताऱ्या ।।
पात भया गिर मेर ।। दास जो मना बिचाऱ्या ।।
सुखराम नाम चिंत्रामणी ।। अे मन चिंत्या काम ।।
परिक्षीत सिंव्यो सात दिन ।। षट दलिप अेक जाम ।।१२।।

जसे चिंतामणी जे मनात चिंतन करतो तसे फळ देतो.परीक्षित राजाचे नागाच्या दंशाने मरण होणार होते.ज्या कारणाने परीक्षित राजा मूत्यूनंतर अगती मध्ये जाऊन राहिला होता.त्याला निजमनाने अगती नको होती,मुक्ती पाहिजे होती.त्याच्याजवळ शरीर सुटायला फक्त सात दिवस होते इतका कमी वेळ असल्यावरही रामनाम रटल्याने परीक्षित राजा अगतीत न जाता मोक्षात जातो.असा हा रामशब्द चिंतामणी सारखा आहे. रामशब्द जसा जीव चिंतन करतो तसे काम करतो.

असेच षटवांग राजाजवळ शरीर सोडायला फक्त दोन मुहूर्त म्हणजे दीड ते दोन तास बाकी होते.षटवांग राजाला काळाच्या मुखातून मुक्त व्हायचं होते.वेळ कमी होता परंतु षटवांग राजा निजमनाने मोक्ष चाहत होता.षटवांग राजा वेळेची सावधानी बाळगून गुरुच्या जवळ जाऊन रामनामाचा भेद घेतो आणि रामनाम रटून आपला उध्दार करुन

घेतो.असे हे रामनाम चिंतामणी सारखे जीव जे चिंतन करेल तसे फळ देईल.रामनाम चिंतामणी कसे त्याचे जगात घडलेले दोन दाखले.

१)नामदेवाला झाडाचे पान गिरवरासारखे भारी(जड)करायचे होते आणि २)रामचंद्राला दगड झाडाच्या पानासारखा हलवन करायचा होता.

नामदेवाला दान देण्याकरीता एका दाताने अती आग्रह केला.नामदेव रामनामी होता. त्याला दाता फक्त परमात्माच दिसत होता.जो दाता दान देणे चाहत होता तो त्याला दाता दिसतच नव्हता परंतु दाता दानी नाही,दानी फक्त राम आहे ही समज दाता आणण्यासाठी नामदेवने दाताकडून दान घेण्याचे निमंत्रण स्विकारले,निमंत्रणा नुसार नामदेव दाताजवळ दान घ्यायला गेला आणि एका झाडाच्या पाना ऐवढे दान मागितले.दाताला नामदेव ने मागितलेल्या दानाला पाहून दु:ख झाले आणि मनात समज बनविली की याला काय द्यायचे?शेवटी दाताने नामदेवाचे रामनाम लिहिलेला पत्ता तराजूत एका पारड्यावर चढविला आणि दुसऱ्या पारड्यात महागहून महाग वस्तू तिजोरीतून मागवली आणि ठेवली. जशी ती वस्तू ठेवली नामदेवा कडून घेतलेला पत्ता त्या वस्तूहून भारी(जड)होऊन गेला. अशाप्रकारे तराजूत दाता तिजोरी तसेच घरातून रत्न,जवाहिर,हिरे,पन्ने,लाल,मोती,सोने, चांदी काढून काढून ठेवू लागले तस तसे झाडाचे पान जड होऊ लागले.शेवटी दाताच्या तिजोरीत आणि घरात तराजून टाकायला काही शिल्लक राहिले नाही तेव्हा दाताला ज्ञानाने समज आली की दाता फक्त रामजी आहे.रामजीच्या शिवाय जगात कोणी दाता नाही.अशाप्रकारे रामने नामदेवच्या चाहनेनुसार झाडाचे पान पहाडासारखे जड केले. रामचंद्राला लंकेत वानरसेना घेऊन जाण्याकरीता पुल बनवायचा होता.त्याच्याकरीता भारी भारी दगड पत्यासारखे हलके झाले पाहिजे ही गरज होती.रामचंद्राने दगडावर राम लिहिले आणि ते सर्व दगड समुद्रात टाकू लागला.दगड समुद्रात पडताच पत्यासारखे हलके होऊन गेले आणि पाण्यावर तिरु लागले ज्याच्याने पुल बांधला गेला.

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगून राहिले की,जसे चिंतामणी मन चिंतननुसार फळ देतो तसेच रामनाम,रामनाम रटणाऱ्या दासाची जी निजमनाने चाहणा होईल तसे फळ देतो. ।।१२।।

कवत:–

साचो हे हर नाव ।। ओर सब ही जुग झूठे ।।
ज्यूं जळकी पिणीहार ।। होय ऊपजे सब फुटे ।।
ने छे रहे न कोय ।। अंत सब ही चल जावे ।।
प्रदेसी की प्रीत ।। ताहे मे क्या सुख पावे ।।

भांड भया इण संग ।। नाव केता धर लाया ।।
केवळ बिन सुखराम ।। नांव असे दिखलाया ।।१३।।

हर नाव हे खरे आहे.अन्य सर्व नाव हंसाला काळाच्या मुखातून काढण्यासाठी असमर्थ आहे म्हणून खोटे आहे.असेच गोत कुटूंब आहे.हे गोत कुटूंब तसेच अन्य मायावी नाव निश्चल नाही.शरीराचा अंत आल्यावर काळाच्या मुखातून सोडविण्यांच्या कामी येत नाही.हे गोत कुटूंब आणि मायावी नाव पाण्यापासून उपजलेले बुड्बुड्यासारखा आहे. जसे नालीचे पाणी वरतून पडते तेव्हा खालच्या पाण्यात बुड्बुडा उठतो आणि उपजलेला बुड्बुडा पाहता पाहता फुटून जातो,बुड्बुडा निश्चल राहत नाही.अशाच प्रकारे अन्य अनेक नाव आणि गोत कुटूंब मायावी प्रकृतीने उपजतात आणि नाश होऊन जातात.हंस अमर आहे,निश्चल आहे. हंसाचे शरीर मायावी आहे म्हणजे मरणारे आहे,निश्चल नाही.हे अन्य नाव आणि गोत कुटूंब हंसाचे शरीर हंसाला मृत्यु होताच जसे सोडून देतो तसेच हे अन्य नाव आणि गोत कुटूंब हंसाचे शरीर सुटताच हंसाला सोडून देतात कारण हे नाव आणि गोत कुटूंब शरीराशी जुडलेले राहतात हंसाशी जुडलेले राहत नाही म्हणून अन्य नाव आणि गोत कुंटुंब हंसाच्या सोबत चालत नाही.रामनाम हे खरे आहे,निश्चल आहे.ते शरीराशी जुडत नाही,ते हंसाशी जुडते या कारणाने हंसाचे शरीर सुटल्यावरही ते हंसाच्या सोबत शेवटपर्यंत राहते ज्याच्याने काळ हंसाच्या जवळही येत नाही.जसे परदेशीच्या संपर्कात आल्याने त्याच्याशी प्रिती होऊन जाते आणि त्याच्याशी प्रितीत सुख मिळते परंतु ते सुख सदाकरीता राहत नाही.जसे परदेशी आपल्यापासून वेगळा होऊन जातो तसेच परदेशीपासून जे सुख मिळून राहिले होते ते संपून जाते.अशाच प्रकारे कुटूंब परीवारासोबतचे सुख आहे.जसे शरीर सुटून जाते.आम्ही कुटूंब परीवारशी वेगळे होऊन जातो आणि वेगळे होण्याच्या आधी जे सुख मिळून राहिले होते ते नष्ट होऊन जातात.

जगात अनेक मायावी नाव आहेत.शंकरचे नाव,विष्णुचे नाव,देवीचे नाव इत्यादी मनुष्याने शंकराचे नाव धारण केले तो मनुष्य शंकराचा भक्त दिसतो.शंकराला सोडून विष्णुचे नाव धारण केले तर तोच मनुष्य वैष्णव भक्त बनतो.विष्णुची भक्ती सोडली आणि शक्तीची भक्ती धारण केली तर तोच भक्त शक्तीचा भक्त जगात समजला जातो.जसे जगात भांड बनतात म्हणजे वेगवेगळे पोषाख घालून बहुरुपी बनतात.राजाचा पोषाख घातला की तो मनुष्य राजाच्या रुपाचा दिसतो.विष्णुचा पोषाख घातला की तो मनुष्य विष्णुसारखा दिसतो.हनुमानाचा पोषाख घातल्याने तोच मनुष्य हनुमानासारखा दिसू लागतो.हे भांडाचे रुप शरीराच्या पोषाखाने बनले,त्या मनुष्याचे खरे रुप नव्हते. जसा पोषाख उतरला खरे रुप मनुष्याचे जे होते ते समोर येते म्हणजे पोषाख

शरीरावरचा होता.शरीराचे स्वत:चे नव्हते.दाखले मात्र जसे असली राजा आणि भांडाचे सोंग घेतलेला राजा असली राजाने कितीही कपडे उतरविले तरीही तो राजाचा राजाच असतो परंतु भांड राजाचे कपडे उतरविताच भांड राजा राहत नाही तो जसाचा तसा परिस्थितीचा लाचार मनुष्य बनून जातो.अशाच प्रकारे खरा केवल राम आहे आणि खोटे अन्य मायावी नाव आहेत.अन्य मायावी नाव हंसाचे शरीर सुटताच हंसाचे भवसागरातून तारण्याचा साथ मध्येच सोडून देतो परंतु केवल राम भवसागरातून तारल्यानंतरही शेवटपर्यंत महासुख देण्याकरीता सोबत राहतो.असा केवल राम आणि अन्य नावात फरक आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी जगाच्या सर्व स्त्री–पुरुषांना सांगितले आहे.।।१३।। ।। इति सिमरण को अंग संपूरण ।।